


# स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन स्पर्धेत के. के. वाघ प्रथम

नाशिक : प्रतिनिधी

**भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयातर्फे घेण्यात आलेल्या स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन - २०२४ स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर या दोन्ही प्रकारात उल्लेखनीय यश संपादन करत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यावेळी तीन संघांना एकूण दोन लाख पन्नास हजारांचे रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे सन २०२२, २०२३ व २०२४ सलग तिसऱ्यांदा या स्पर्धेत विजय मिळवत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने विजयासह बक्षिसांची हॅट्ट्रिक केली.**

दिनांक ११ व १२ डिसेंबर २०२४ रोजी सॉफ्टवेअर प्रकारासाठी तसेच दिनांक ११ ते १५ डिसेंबर २०२४ या कालावधीत हार्डवेअर प्रकारासाठी स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २०२४ ही स्पर्धा पार पडली.

प्राथमिक फेरीतील पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम फेरीत निवड झाली. त्यात नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी श्रीनगर येथील नोडल सेंटर येथे तृतीय वर्ष कॉम्पुटर विभागात शिकत असलेले हरिष लुकारे, प्रिती राठी, सायली उगलमुगले, किशन माळी, तन्मय तांबट, प्रद्युम्न पाटील यांनी मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस अँड एम्पॉवरमेंट यांनी दिलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर प्रकल्प सादर केला. त्यास १ लाख रुपयांचे पारितोषिक प्राप्त झालेले आहे. विद्यार्थ्यांना प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, तिरुपती येथील नोडल सेंटर येथे झालेल्या हॅकॅथॉन स्पर्धेत सॉफ्टवेर प्रकारात पर्णिका पाटील, हर्षल पाटील, पंकज मराठे, प्रतीक चंद्रात्रे, आदित्य देवळालीकर, अथर्व गाडेकर यांनी मिनिस्ट्री ऑफ आयुष यांनी दिलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर प्रकल्प सादर केला. द्वितीय, तृतीय वर्ष कॉम्पुटर सायन्स आणि डिझाईन व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स अभियांत्रिकीमध्ये शिकत असलेल्या या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. त्यास १ लाख रुपयांचे पारितोषिक प्राप्त झालेले आहे. विद्यार्थ्यांना प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी रुर्की येथे झालेल्या हॅकॅथॉन स्पर्धेत हार्डवेअर प्रकारात ओसिनिया क्षेत्रिमयूम, अक्षदा खैरनार, मेघराज भावसार, श्रेय साळुंखे, ईशान जावळे, प्रणव प्रजापती या गव्हर्नमेंट ऑफ हिमाचल प्रदेश यांनी दिलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंटवर प्रकल्प सादर केला. द्वितीय, तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स अभियांत्रिकीमध्ये शिकत असलेल्या या टीमने उत्तम सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांना रु. ५० हजारांचे पारितोषिक मिळाले.

**Gavkari 27-12-2024**